५८

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/१८७२
दिनांक : २२/०६/२०२०

-: आदेश :-

विषय :- **<u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>**
कोरोना विषाणू आजाराच्या (कोवीड-१९) अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्रा (Micro Containment Zone) मध्ये सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र नियंत्रण अधिकारी म्हणून उप अभियंता / शाखा अभियंता यांचे नेमणूकीबाबत.

संदर्भ :-
१) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) आदेश जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/११४५, दि. २५.०५.२०२०
५) आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/१२९४, दि.०२.०६.२०२०.
६) आदेश जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/१३३९, दि. ०३.०६.२०२०
७) आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/१६५३, दि.१६.०६.२०२०.

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

त्यास अनुसरून पुणे महानगरपालिकेचे क्षेत्रिय कार्यालयातील प्रतिबंधित क्षेत्रा (Containment Zone) करीता परिमंडळ, उप आयुक्त यांना सहकार्य करण्यासाठी प्रतिबंधित क्षेत्र नियंत्रण अधिकारी म्हणून उप अभियंता/ शाखा अभियंता यांना संदर्भ क्र. ६ अन्वये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी नव्याने सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र संदर्भ क्र. ७ अन्वये जाहीर करण्यात आले आहेत.

पुणे महानगरपालिकेचे क्षेत्रिय कार्यालयातील प्रतिबंधित क्षेत्रा (Containment Zone) करीता परिमंडळ, उप आयुक्त यांना सहकार्य करण्यासाठी प्रतिबंधित क्षेत्र नियंत्रण अधिकारी म्हणून उप अभियंता/ शाखा अभियंता यांना संदर्भ क्र. ६ अन्वये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर आदेशामध्ये अंशत: बदल करण्यात येत असून नव्याने सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र नियंत्रण अधिकारी यांची सोबत जोडलेल्या परिशिष्ट - अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर नियंत्रण अधिकारी यांनी संदर्भ क्र. ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

सदर सेवकांनी स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून प्राधान्याने सदरचे कामकाज करावयाचे आहे.

सोबतच्या यादीतील उप अभियंता/ शाखा अभियंता यांनी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कामास नकार देणाऱ्या, हलगर्जीपणा करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.